# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 05/12/2019 (गुरूवार)
# (सकाळ)

---

## खून

पो.स्टे. बोरी :– अंतर्गत 10 कि. मी अंतरावर बोथली (मरसघाट) शिवार, मनसुखलाल भाई पटेल रा.गुजरात यांचे शेतातील विहीरीत येथे दिनांक 04/12/2019 चे 08.30 वा. दरम्यान फिर्यादी हे त्याचे ठेक्याने केलेल्या शेतावर पराठी तुरीचे पिकाला पाणी देण्यासाठी गेले व विहीरीतील मोटरपंप पाहण्यास विहीरीत डोकावुन बघीतले असता पाण्यावर एका अनोळखी स्त्रीचे प्रेत तरंगतांना दिसून आले. पोलीसांना माहीती देवुन फिर्यादीने दाखविले प्रमाणे पोलीसांनी व गावकऱ्यांनी दोर व स्ट्रेचरचे मदतीने अनोळखी स्त्रीचे प्रेत बाहेर काढले असता तिला डोक्यावर, तोंडाला, हनुवटीवर मोठया जखमा दिसुन आल्या. त्यावरून अनोळखी मयत स्त्रीला अज्ञात आरोपीने अज्ञात कारणावरून जबर मारहाण करून दुखाःपत करून जिवानिशी ठार मारले. तसेच आरोपीने प्रेत फिर्यादीचे ठेक्याने केलेल्या मनसुखलाल भाई पटेल, रा. गुजरात यांचे मालकीचे शेतातील विहीरीत आणुन टाकले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– अकुंश परसराम पंधराम, वय 49 वर्ष, रा. बेंदोली वार्ड क्र.2, पोस्ट ठाणा पादरी, ता. उमरेड .जि.नागपुर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 302 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री. ए.बी.शेख हे करीत आहे.

## घरफोडी

पो.स्टे. देवलापार :– अंतर्गत 13 कि.मी अंतरावर मौजा पथराई, ता. रामटेक येथे दिनांक 02/12/2019 चे 10:00 वा. ते 17:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– विजय लक्ष्मण राउत, वय 41 वर्ष, रा.पथरई ता. रामटेक हे घराला कुलूप लावून तुमसर, जि. भंडारा येथे टमाटर विकण्याकरीता गेले होते. दरम्यान अज्ञात आरोपीने घराचे मागच्या दाराचे आतील लोखंडी साखळी खोलून घरात प्रवेश केला. तसेच आरोपीने घरामधील बेडरूममध्ये कपाटात ठेवलेले सोन्या–चांदीचे दागिने कि. 3,200/–रू. व नगदी कि. 70,000/–रू. असा एकुण कि. 73,200/–रू. चा मुद्येमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. देवलापार येथे आरोपीविरुध्द कलम 454, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक पुजंरवाड 7775092593 हे करीत आहे.

## चोरी

1) पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 10 कि.मी अंतरावर मौजा धापेवाडा महेश बार येथे दिनांक 03/12/2019 ते दिनांक 04/12/2019 चे रात्री दरम्यान फिर्यादी नामे– रमेश बारसुजी राजगुरे, वय 62 वर्ष, रा. वार्ड क्र. 4, धापेवाडा यांच्या मालकीचे बार ॲन्ड रेस्टॉरेन्टचे अज्ञात आरोपीने लोखंडी चॅनल गेट वाकवून व आतील दाराचे कुलूप तोडून आत प्रवेश केले. तसेच आरोपीने बारमधील 1) डीवीआर कि. 10,000/–रू., 2) सिम राइटर कि. 1,000/–रू., 3) एक कनेक्टीव्हीटी कि. 1,000/– रू., 4) एक एल.सी.डी कि. 10,000/–रू. व 5) 51 विदेशी दारूच्या निपा कि. 9,540/–रू. असा एकुण कि. 31,540/–रू. चा मुद्येमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ अनिल तिवारी हे करीत आहे.

2) पो.स्टे. उमरेड:– अंतर्गत 04 कि.मी अंतरावर कृष्णाबार ॲन्ड रेस्टॉरेन्ट वायगाव घोटुर्ली येथे दिनांक 03/12/2019 चे 23:30 वा. ते दिनांक 04/12/2019 चे 11:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– यशवंत मोतीराम मेश्राम, वय 43 वर्ष, रा. उदासा यांच्या कृष्णाबार ॲन्ड रेस्टॉरेन्टचे अज्ञात आरोपीने मागील लोखंडी ग्रीलची खिडकी वाकवून बारचे आत प्रवेश केले. तसेच आरोपीने बारमधील ड्रावर मध्ये ठेवलेले नगदी 28,000/–रू. व काउंटरच्या खाली ठेवलेले आरएस कंपनीचे 180 मिलीच्या 02 निपा कि. 500/–रू. असा एकुण कि. 28,500/–रू. चा मुद्येमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार संजय कुलकर्णी 9422818062 हे करीत आहे.

## रेती चोरी करणाऱ्या आरोपी अटक

पो.स्टे. खापा :– अंतर्गत 2 किमी अंतरावर फॉरेस्ट नाका येथे दिनांक 04/12/2019 चे 21.15 वा. ते 21:45 वा. दरम्यान एमच–40/एटी–1212 क्रमांकाचा ट्रकचा चालक आरोपी नामे– विक्की जगदीश पंदराम, वय 26 वर्ष, रा. गोंडी मोहगाव, काटोल यांने त्याच्या ताब्यातील वाहनात विनापरवाना अवैधरित्या 7 ब्रास रेती किं. 28,000/– रू. रेती भरून वाहतुक करतांना मिळुन आला. वाहनासह एकुण 25,28,000/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सर तर्फे पोलिस नाईक अंकुश लाखे यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम 379, 109 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक झाबरे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर